


दैनिक


# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार 21 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 273 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com







# परळीतील तहसीलदार लाच प्रकरणाने महसूल प्रशासन हादरले; पोलीस ठाण्यासमोर राजकीय गर्दीची चर्चा

■ (परळी विशेष वृत्त)

परळी : परळी तालुक्यातील महसूल प्रशासन पुन्हा एकदा चर्चेच्या भोवऱ्यात सापडले असून तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्याविरुद्ध उघडकीस आलेल्या कथित लाच प्रकरणामुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. सालंसी (ऐपतीचे) प्रमाणपत्र देण्यासाठी ५० हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आल्यानंतर एसीबीने सापळा रचून कारवाई केली. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराकडून सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र नंतर तडजोडीनंतर २० हजार रुपयांवर व्यवहार ठरल्याची माहिती समोर येत आहे. तक्रार दाखल झाल्यानंतर बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी करत नियोजनबद्ध सापळा रचला. दरम्यान, तक्रारदाराच्या हालचालींवर संशय आल्याने तहसीलदार मुंडे यांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केल्याचेही सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. तरीदेखील एसीबीने आवश्यक पुरावे संकलित करून पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. या कारवाईनंतर परळी तालुक्यातील महसूल प्रशासनात एकच खळबळ उडाली असून जिल्हाभर या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे. संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते असून पुढील तपास बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून केला जात आहे. भ्रष्टाचाराविरोधातील या कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून प्रशासनातील पारदर्शकतेसाठी अशा कठोर कारवाया आवश्यक असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे. एकूणच या प्रकरणामुळे परळी प्रशासनात लाचखोरी वाढते आहे का, असा सवाल पुन्हा एकदा उपस्थित होत असून, या घटनेचा तपास कोणत्या निष्कर्षापर्यंत पोहोचतो याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.






## पोलीस ठाण्यासमोर नेमकी गर्दी कशासाठी ?

■ कारवाईनंतर एसीबी अधिकाऱ्यांनी तहसीलदार मुंडे यांना परळी शहर पोलीस ठाण्यात आणले असता तेथे मोठी गर्दी जमल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे या गर्दीत राजकीय क्षेत्रातील काही मंडळींची उपस्थितीही लक्षणीय असल्याची चर्चा होती. मात्र हा जमाव नेमका समर्थनासाठी, माहिती जाणून घेण्यासाठी की राजकीय हालचालींचा भाग म्हणून जमला होता, याबाबत अधिकृत स्पष्टता मिळू शकली नाही.

## व्यंकटेश मुंडे यांची वादग्रस्त कार्यपद्धतीन

■ दरम्यान, लोकसभा निवडणुकीमध्ये शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांवर आरोप करत परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांना निवडणूक कामकाजापासून दूर ठेवण्याची मागणी केली होती. तर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही व्यंकटेश मुंडे यांच्या नावाचा वारंवार उल्लेख करत त्यांची बीड जिल्ह्याबाहेर बदली करण्याची मागणी केली होती. धक्कादायक म्हणजे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी अनेक बोगस जन्म मृत्यू प्रमाणपत्रे परळी तहसीलमधून प्रदान करण्यात आल्याचे प्रकरण हाती घेतले होते. त्यामुळे या प्रकरणातही व्यंकटेश मुंडे यांच्यावर संशयाची सुई होती. तसेच वैद्यनाथ मंदिराच्या जमिनीवरील अतिक्रमण प्रकरणातही तहसीलदार तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष या नात्याने व्यंकटेश मुंडे हे या प्रकरणात दुर्लक्ष करत असल्याचा देखील आरोप झालेला आहे.

# मोदींच्या इस्त्रायल दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भारत-इस्त्रायलमध्ये नवा संरक्षण करार

■ नवी दिल्ली वृत्तसंस्था :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नियोजित इस्त्रायल दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भारत आणि इस्त्रायल यांच्यात संरक्षण क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. या करारामुळे दोन्ही देशांमधील संरक्षण उद्योग, तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि संयुक्त उत्पादनाला नवे बळ मिळणार असल्याचे मानले जात आहे.

संरक्षण क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि उत्पादन प्रक्रियेत परस्पर सहकार्य वाढविणे हा या कराराचा मुख्य उद्देश असून, भारताच्या संरक्षण संपादन प्रक्रियेअंतर्गत (डीपीपी 2026) लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांना एकत्र आणून अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचे सह-उत्पादन आणि विकास यावर विशेष भर देण्यात येणार आहे. त्यामुळे 'मेक इन इंडिया' उपक्रमालाही चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तेल अवीव येथे आयोजित विशेष परिसंवादात भारतीय आणि इस्त्रायली संरक्षण कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या बैठकीत संरक्षण उद्योगातील भागीदारी, तांत्रिक सहकार्य, नव्या संशोधन प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व सोसायटी ऑफ इंडियन डिफेन्स मॅन्युफॅक्चर्स (SIDM) चे महासंचालक यांनी केले, तर इस्त्रायलमधील भारतीय राजदूत जे. पी. सिंह यांचीही उपस्थिती होती.



हा करार गेल्या नोव्हेंबरमध्ये झालेल्या संयुक्त कार्यगटाच्या (JWG) बैठकीचा पुढील टप्पा मानला जात असून धोरणात्मकदृष्ट्या तो अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २५ फेब्रुवारी रोजी दोन दिवसांच्या इस्त्रायल दौऱ्यावर जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. या दौऱ्यात संरक्षण, सायबर सुरक्षा, तंत्रज्ञान आणि प्रादेशिक सुरक्षेसह विविध द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, भारत-इस्त्रायल संबंध गेल्या काही वर्षांत सामरिक दृष्ट्या अधिक मजबूत झाले असून दहशतवादविरोधी सहकार्य, ड्रोन तंत्रज्ञान, क्षेपणास्त्र प्रणाली आणि संरक्षण संशोधन या क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये घनिष्ठ भागीदारी निर्माण झाली आहे. नव्या संरक्षण करारामुळे या सहकार्याला अधिक संस्थात्मक स्वरूप मिळणार असून भविष्यात संयुक्त उत्पादन, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि संरक्षण निर्यातीत भारताला मोठा फायदा होण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.


# 'गलगोटियास' आणि रोबोटिक डॉग

## 'रोबोटिक डॉग' प्रकरणावरुन एआय प्रदर्शनात वाद; विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह

■ नवी दिल्ली | वृत्तसंस्था

राजधानी दिल्ली येथे भरलेल्या एआय प्रदर्शनादरम्यान 'रोबोटिक डॉग' संदर्भातील वादामुळे गलगोटियास विद्यापीठाचे नाव चर्चेत आले असून या प्रकरणामुळे भारतातील एआय क्षेत्राच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रदर्शनात सादर करण्यात आलेल्या रोबोटिक डॉगच्या उगमाबाबत निर्माण झालेल्या शंकांमुळे हा वाद अधिक चिघळला.

मिळालेल्या माहितीनुसार, एआय एक्स्पोमध्ये 'ओरियन' नावाने सादर करण्यात आलेला रोबोटिक डॉग विद्यापीठाने विकसित केल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या चित्रफिती आणि तज्ज्ञांच्या निरीक्षणानंतर हा रोबोटिक डॉग चिनी बनावटीचा असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. यामुळे प्रदर्शनातील सादरीकरणावरून मोठी चर्चा रंगली.




वाद वाढताच विद्यापीठ प्रशासनावर टीकेची झोड उठली. सुरुवातीला हा रोबोटिक डॉग स्वतःची निर्मिती असल्याचे संकेत देण्यात आल्याचा आरोप झाला, तर नंतर स्पष्टीकरण देत गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र या प्रकरणामुळे शैक्षणिक संस्थांच्या संशोधन सादरीकरणाच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर संबंधित स्टॉल रिकामा करण्यात आल्याची माहिती समोर आली असून आयोजकांनाही परिस्थिती हाताळण्यासाठी हस्तक्षेप करावा लागल्याचे सांगितले जाते. तज्ज्ञांचे मत आहे की, एआय आणि रोबोटिक्ससारख्या संवेदनशील क्षेत्रात नवोन्मेष सादर करताना पारदर्शकता आणि सत्यता अत्यंत महत्त्वाची असते. या वादामुळे भारताच्या एआय क्षेत्रातील नवोन्मेषाविषयी असलेल्या विश्वासाला धक्का बसू शकतो, अशीही चर्चा रंगत आहे. भविष्यात अशा प्रदर्शनांमध्ये सादर होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या प्रामाणिकतेची काटेकोर पडताळणी करण्याची गरज अधोरेखित होत आहे.

# लाडक्या बहिणींना लवकरच मिळणार हप्ता ; तांत्रिक अडचणी दूर !

■ मुंबई : वृत्तसंस्था

राज्यातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या हप्त्याची प्रतीक्षा करणाऱ्या लाखो महिलांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून तांत्रिक अडचणी आणि ई-केवायसी प्रक्रियेमुळे रखडलेला जानेवारी महिन्याचा हप्ता आता लवकरच लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सामाजिक न्याय विभागामार्फत निधी वितरणाची प्रक्रिया वेगाने सुरू असून सुमारे १४ कोटी ५४ लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यासाठी हालचाली तीव्र झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. अर्थ मंत्रालयाकडून तांत्रिक प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून निधी थेट आधार-लिंक बँक खात्यात जमा केला जाणार आहे.




गेल्या काही दिवसांपासून हप्ता रखडल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र शासनस्तरावर तांत्रिक अडथळे दूर करण्यासाठी समन्वयाने काम सुरू असून प्रलंबित हप्ता लवकरच वितरित करण्याचे संकेत मिळत आहेत. विशेषतः ज्या महिलांचे ई-केवायसी आणि कागदपत्रे पूर्ण आहेत, त्यांच्या खात्यात रक्कम प्राधान्याने जमा होणार असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, या योजनेतून सुमारे २ कोटी ४० लाख लाभार्थी नोंदणीकृत असताना त्यापैकी जवळपास ६६ लाख महिलांना अपात्र ठरविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. केवायसी बंधनकारक करण्यात आल्याने आणि तांत्रिक त्रुटींमुळे अनेक अर्ज बाद झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. त्यामुळे पात्र असूनही काही महिलांना लाभापासून वंचित राहावे लागल्याची खंत व्यक्त केली जात आहे. महिलांना केवायसी प्रक्रियेत तांत्रिक चुका झाल्यास अर्ज दुरुस्त करण्यासाठी अंतिम संधी देण्यात आली असून ३१ मार्चपर्यंत आवश्यक दुरुस्ती करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे अपात्र ठरलेल्या महिलांना पुन्हा पात्र होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

# श्री भराडी देवीची व तिच्या यात्रेची महती जगभरात

■ सिंधुदुर्ग वृत्तसंस्था


आंगणेवाडी येथील श्री भराडी देवीचा महिमा भारतासह जगभरात पसरला आहे. कोकणची काशी समजल्या जाणाऱ्या या आंगणेवाडीत येऊन भराडी देवीच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेण्याचा योग लाभला. एरवी बातम्यामध्ये या जत्रेची महती पाहत होतो, वाचत होतो. पण आता प्रत्यक्ष येथे येण्याचा योग आला. लाखोच्या संख्येने भाविक उपस्थित राहणाऱ्या आंगणेवाडी यात्रेचे उत्कृष्ट नियोजन आंगणे मंडळाने केले आहे असे प्रतिपादन अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराज वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी केले.

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराज वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी मंगळवारी सायंकाळी आंगणेवाडी यात्रेला भेट देऊन श्री भराडी देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे आंगणेवाडी ग्रामस्थ मंडळ आणि आंगणे कुटुंबियांतर्फे स्वागत करून सत्कार करण्यात आला. यावेळी आंगणेवाडी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष छोटू आंगणे, सचिव काका आंगणे, उपाध्यक्ष आनंद आंगणे, वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज देवस्थान अक्कलकोट सचिव आत्माराम घाटगे विश्वस्त महेश गोगी, हडपिड मठ अध्यक्ष प्रभाकर राणे, सचिव नंदकुमार पेडणेकर,खजिनदार ज्ञानेश्वर राऊत, बाबू आंगणे, स्वामीभक्त व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अशोक सावंत, रघुनाथ आंगणे, दाजी सावजी, सचिन लोके, दीपक आंगणे, सौ. नीलम पेडणेकर, श्री पितळे, समीर आंगणे, आबा आंगणे, प्रसाद आंगणे, दिनेश आंगणे, सौ लता पालयेकर, राजेश पारधी तसेच इंगळे यांच्या समवेत प्रथमेश इंगळे, प्रा.शिवशरण अचलेर, डॉ.हिरण्णा पाटील, बाबा सुरवसे, सुरेश वाले सर बाबासाहेब निंबाळकर, विश्वनाथ देवरमनी आदीसह विश्वस्त उपस्थित होते. यावेळी महेश इंगळे म्हणाले, "आंगणेवाडी येथील श्री भराडी देवीचे स्वयंभू असे स्थान आहे. भराडी देवीची व तिच्या यात्रेची महती जगभरात पसरली आहे. अशा यात्रेला उपस्थित राहून समाधान वाटले. सर्वांच्या सुख शांतीसाठी भराडी चरणी गाऱ्हाणे घातले आहे. श्री स्वामी समर्थ आणि कोकणचे जुने नाते आहे. स्वामी समर्थ यांचे कोकणातही वास्तव्य होते. अशा पावन भूमीत येण्याचा योग आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्वामी समर्थांच्या विविध मठांना आपण भेटी देत आहोत. कोकणातून दरवर्षी बहुसंख्य स्वामी भक्त अक्कलकोट येथे भेट देऊन स्वामींचे दर्शन घेतात. श्री भराडी देवी व श्री स्वामी समर्थ यांचा कृपाशिर्वाद सर्वांवर कायम रहावा" असेही महेश इंगळे म्हणाले.

संपादकीय

# सुनेत्रा पर्वाचे संकेत

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचे मोठे आव्हान राष्ट्रवादीपुढे उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवारांचा राजकीय वारसा, पक्षाचे भवितव्य आणि सुनेत्रा पवार यांच्या भूमिकेकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यावर महाराष्ट्राचा कानाकोपरा खऱ्या अर्थांने शोकाकुल झाल्याचे मागील तीन दिवसांत पाहावयास मिळाले. अजित पवार यांच्या जाण्याने पवार कुटुंबीयांची, राष्ट्रवादी पक्षाची, बारामतीकरांची जितकी हानी झाली, त्याहून अधिक हानी अजित पवारांवर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची व महाराष्ट्रातील जनतेची झाली आहे. स्पष्टवक्तेपणा, रोखठोक विचार मांडणारा एक राजकारणी महाराष्ट्राने गमविला. मराठीतील नावाजलेले कवी भा. रा. तांबे यांनी त्यांच्या कवितेत म्हटलेच आहे की, रामकृष्णही आले–गेले, त्याविण जग का ओसचि पडले. काळ हा सुरूच राहतो, वेळ कधीही, कोणासाठी थांबत नाही. अजित पवारांच्या अकाली जाण्याने पार्थ, जय व सुनेत्रा पवार तसेच अन्य पवार कुटुंबीयांचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. संघटना पोरकी झाली आहे. संघटना अधिक काळ निर्णायकी ठेवून चालत नाही. दु:ख बाजूला ठेवून निर्णय घ्यावेच लागतात. मासा पाण्यात रडतो, त्याचे अश्रू कधीही कोणाला दिसत नाहीत. तशीच अवस्था आज अजित पवारांवर प्रेम करणाऱ्या सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ व राष्ट्रवादीच्या अन्य नेत्यांची व मंत्र्यांची झालेली आहे. महाराष्ट्र राज्याचे तब्बल ६ वेळा अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपद भूषविले आहे. राज्याचा ११ वेळा अर्थसंकल्प अजितदादांनी मांडला आहे. अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्राचे एक उपमुख्यमंत्रीपद रिक्त झाले आहे. राज्याला नव्याने अर्थमंत्री शोधावा लागणार आहे. राज्याला उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तर राष्ट्रवादी पक्षाला संघटना सांभाळणारे नेतृत्व हवे. अजित पवारांच्या जाण्याने पवार कुटुंबीय शोकाकुल असले तरी उपमुख्यमंत्री व पक्षाचे प्रमुखपद रिक्त ठेवणे परवडणारे नसल्याने राष्ट्रवादीच्या पहिल्या फळीतील नेतेमंडळींनी धावपळ सुरू केली आहे आणि ते करणे गरजेचे होते. अजित पवारांची व शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याची चर्चा गेल्या दोन–अडीच महिन्यांपासून सुरू आहे. अजित पवारांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता आणि शरद पवारांनीही त्यास संमती दिली होती. विलीनीकरणावर शिक्कामोर्तब होण्याची घटिका समीप आली आणि काळाने अजितदादांवर झडप घालून त्यांना हिरावून नेले. अजितदादांचे वारस म्हणून त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळावी आणि पार्थ पवारांना राज्यसभेवर पाठवावे, असा सूर आता राष्ट्रवादीच्या खासदार, आमदार, मंत्री, पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून आळविला जात आहे. शरद पवारांचे बोट धरून राजकारणात आलेल्या अजित पवारांनी काही कारणास्तव काकांपासून वेगळे होत आपली स्वतंत्र राजकीय चूल मांडली होती. अजित पवारांच्या पाठीशी स्वतंत्र जनाधार असल्याने विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार मोठ्या संख्येने निवडून आले होते. अजित पवारांच्या तसेच शरद पवारांच्या दोन्ही राष्ट्रवादीमधील प्रत्येकाचीच नव्हे तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यावेत, काका–पुतणे पुन्हा एकाच राजकीय व्यासपीठावर एकत्रित दिसावेत अशी महाराष्ट्रीय जनतेचीही इच्छा आहे. सुनेत्रा पवार या लोकसभा निवडणुकीनंतर राजकीय व्यासपीठावर सक्रिय झाल्या असल्या तरी गेली अनेक दशके त्यांनी अजित पवारांच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात पडद्याआडून साथ दिलेली आहे. लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळेंविरोधात पराभूत झाल्यावर अजित पवारांनी त्यांना राज्यसभेवर खासदार बनविले. एप्रिल २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये रायगड मतदारसंघातून राष्ट्रवादीकडून पार्थ पवार निवडणूक लढवित असताना सुनेत्रा पवारांनी पडद्याआडून बऱ्यापैकी धुरा सांभाळल्याचे राष्ट्रवादीमधील घटकांकडून सांगण्यात येत आहे. अजित पवारांनी सार्वजनिक कार्यक्रमातून भाषण करताना अनेकदा सुनेत्रा पवारांचे आभारही मानले. सुनेत्रा पवारांनी घर सांभाळल्याने मला महाराष्ट्र सांभाळता आला असल्याचे, राजकारणासाठी तसेच लोकांसाठी वेळ देता आला असल्याचे सांगत त्यांच्याप्रती कृतज्ञताही व्यक्त केली होती. बारामतीमधील अनेक कार्यक्रमांमध्ये अजित पवारांसोबत सुनेत्रा पवारांची उपस्थिती असायची. अजित पवारांनी स्वत:ची स्वतंत्र राजकीय चूल मांडल्यावर सुनेत्रा पवार यांचा राजकीय ठिकाणी वावर वाढण्यास सुरुवात झाली. आज अजित पवारांच्या जाण्याने पवार कुटुंबीय, राष्ट्रवादी संघटना, सरकारमधील अजित पवारांचे सहकारी या सर्वांना सांभाळण्याची जबाबदारी सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार या परिवारावर आलेली आहे. नजीकच्या काळात राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाल्यावर शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील, रोहित पवार आदी मंडळी मदतीला येतीलच. अजित पवारांच्या जाण्याने रिक्त झालेल्या उपमुख्यमंत्रीपदावर सुनेत्रा पवारांनी बसावे अशी इच्छा राष्ट्रवादीमधील कार्यकर्त्यांकडून व पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे, अनेक आमदारांकडूनही तशी भावना उघडपणे व्यक्त केली जात आहे. तीन दिवसांचा दु:खवटा सुरू असल्याने राष्ट्रवादीमधील घटकांनी याबाबत सुनेत्रा पवार, पार्थ पवार व जय पवार यांच्याशी चर्चा केली नसली तरी लवकरच ते चर्चा करतील व निर्णय घेतील. अजित पवारांच्या जाण्याने दु:ख भरून येणार नसले तरी राष्ट्रवादी संघटनेसाठी, आमदारांसाठी, कार्यकर्त्यांसाठी त्यांना डोळ्यांतील अश्रू पुसून लवकरात लवकर सक्रिय व्हावे लागणार आहे. सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, नीलेश लंके आदी अनेक मंडळी सुनेत्रा पवारांच्या मदतीला असणारच. पार्थ पवार, जय पवार यांनी राष्ट्रवादीच्या तळागाळातील कार्यकर्त्यांशी संपर्क करावाच लागणार आहे. अडचणीच्या काळात अजितदादांचा परिवार स्वत:चे आभाळाएवढे दु:ख बाजूला सारुन पक्षासाठी, कार्यकर्त्यांसाठी सक्रिय झाला आहे, हे चित्र लवकरात लवकर निर्माण होणे राष्ट्रवादीसाठी आवश्यक आहे. सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्रीपदी विराजमान करण्यासाठी राष्ट्रवादीकडून हालचाली सुरु झाल्या आहेत. महाराष्ट्रातील शोकाकुल जनतेचीही ती इच्छा आहे. त्यामुळे लवकरच सुनेत्रा पवारांचा शपथविधी होवून अजित पवारांनंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातून त्यांना निवडून यावे लागेल. महाराष्ट्राच्या राजकीय सारीपटावर सुनेत्रा पर्वाचा शुभारंभ झाल्याचे पहावयास मिळणार आहे.








## साप्ताहिक संवाद

### पोस्ट व शिपरॉकेटतर्फे एमएसएमई निर्यात सक्षमतेस बळकटी

खाजगी कुरिअर आणि डिलिवरी कंपन्यांच्या प्रचंड स्पर्धेत भारता सरकारचे पोष्ट खाते सातत्याने आपल्या ग्राहकांना कमीतकमी खर्चात जलद आणि सुरक्षित डिलिवरी सेवा देण्याचा प्रयत्न करत असते. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून भारतीय पोष्ट खात्याच्या वतीने नुकतीच मुंबई येथून शिपरोकेट च्या आंतराष्ट्रीय कार्यप्रणालीचा शुभारंभ करण्यात आलेला आहे. या सुविधेमुळे लघु उद्योजकांना त्याच्या मालाची निर्यातदारी माफक आणि उच्चदर्जाची मिळणार आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र व गोवा विभागाचे मुख्य पोस्टमास्तर जनरल श्री अमिताभ सिंह, यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

### भारतीय पोष्ट विभागाने शुभारंभ केलेली नवी निर्यात सुविधा काय आहे?

भारतामधून सीमापार ई-कॉमर्स प्रक्रिया सुलभ करण्यासाठी भारतीय डाक विभाग सातत्याने व प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. भारतातून निर्यात वाढीस चालना देण्यासाठी भारतीय डाक विभाग सर्व इच्छुक घटकांशी सहकार्य करत आहे. या प्रयत्नांना यश मिळाल्याची आनंदाची बाब म्हणजे, आता मुंबईतील शिपरॉकेट पोर्टलचा वापर करणाऱ्या निर्यातदारांना विविध देशांमध्ये माल पाठविण्यासाठी इंडिया पोस्टच्या निर्यात सेवांचा लाभ घेता येणार आहे. हा पुढाकार विद्यमान भागीदारीवर आधारित असून टपाल पायाभूत सुविधा, डिजिटल शिपिंग एकत्रीकरण आणि सुलभ कार्यप्रणालीद्वारे निर्यात सक्षमीकरण अधिक बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करते. मुंबई येथील प्रादेशिक सुविधा ही खाते व्यवस्थापन, कार्यात्मक समन्वय आणि सेवा उपलब्धता अधिक परिणामकारक करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरेल. शिपरॉकेटच्या तंत्रज्ञानाधारित वाणिज्य सक्षमीकरण क्षमतेला भारतीय डाक विभाग तांत्रिक कौशल्याची जोड देत, निर्यातदारांसाठी अधिक सक्षम सेवा व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे.

### या नव्या निर्यात सुविधेचा लाभ प्रामुख्याने कोणाला होणार आहे?

देशातील प्रमुख व्यापारी केंद्रांपैकी एक असलेल्या मुंबईतील या धोरणात्मक सुविधेमुळे विशेषतः पश्चिम व दक्षिण भारतातील निर्यातदारांना मोठा लाभ होणार आहे. कार्यात्मक समन्वय, खाते व्यवस्थापन व लॉजिस्टिक एकत्रीकरण अधिक सक्षम केल्यामुळे सेवा व्याप्ति वाढ, जलद निर्यात प्रक्रिया आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक सुलभ प्रवेश सुनिश्चित होईल. विशेषतः देशांतर्गत मागणीपलीकडे विस्तार करू इच्छिणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (MSMEs) याचा मोठा फायदा होईल.

### लघु उद्योजकांना या सुविधेचा प्रत्यक्ष कसा लाभ होणार आहे?

या संयुक्त उपक्रमांमुळे एमएसएमई क्षेत्राची निर्यात सज्जता वाढेल, कार्यप्रणालीतील गुंतागुंत कमी होईल, जागतिक व्यापारात प्रवेशासाठी असलेली अडथळे कमी होतील आणि सीमापार शिपिंग अधिक जलद व विश्वासार्ह बनेल. शाश्वत आंतरराष्ट्रीय वाढ साध्य करू इच्छिणाऱ्या लघु उद्योगांसाठी हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.ही सातत्यपूर्ण भागीदारी भारताच्या ई-कॉमर्स निर्यात परिसंस्थेला अधिक बळकट करण्याच्या तसेच एमएसएमई क्षेत्राचा जागतिक व्यापारातील सहभाग व्यापक करण्याच्या सामायिक बांधिलकीचे प्रतीक आहे.

### मंत्रा प्रॉपर्टीजचा 'झिरो इज द न्यू हिरो' गृहखरेदी महोत्सव

मंत्रा प्रॉपर्टीज ने पुण्यातील सर्व सुरू असलेल्या मंत्रा आणि बर्गंडी प्रकल्पांमध्ये 16 फेब्रुवारी ते 31 मार्च या कालावधीत 'झिरो इज द न्यू हिरो' या 45 दिवसांच्या संरचित गृहखरेदी उपक्रमाची घोषणा केली आहे.घरमालकीचा प्रवास अधिक सोपा आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत सुरुवातीचे महत्त्वाचे खर्च घटक रद्द करण्यात आले असून, स्पष्ट आणि अंदाजे किंमत संरचना सादर करण्यात आली आहे.'झिरो इज द न्यू हिरो' मोहिमेअंतर्गत गृहखरेदीदारांना 0% जीएसटी, 0% फ्लोअर राईज, 0% प्रीमियम शुल्क, 0% बुकिंग रक्कम, 0% कायदेशीर शुल्क या सवलती उपलब्ध असतील:या संरचित उपक्रमाचा भाग म्हणून जीएसटी एकूण किंमत रचनेत समाविष्ट करण्यात आला आहे आणि मजल्यांनुसार असलेले दरांतील फरक समायोजित करून खर्च सादरीकरणात एकसमानता सुनिश्चित करण्यात आली आहे. विविध अतिरिक्त शुल्क काढून टाकून खरेदीच्या निर्णयाच्या टप्प्यावर स्पष्टता निर्माण करणे आणि साशंकता कमी करणे हा कंपनीचा उद्देश आहे.या उपक्रमाबाबत भाष्य करताना, सीईओ रोहित गुप्ता म्हणाले:

"अनेक कुटुंबांसाठी घर खरेदी हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा आर्थिक निर्णय असतो. आमच्या निरीक्षणानुसार, खरेदीची इच्छा असूनही किंमत संरचनेतील गुंतागुंत अनेकदा संभ्रम निर्माण करते. 'झिरो इज द न्यू हिरो' हा उपक्रम त्या प्रवासाला सोपा करण्याचा आमचा प्रयत्न आहे. अनेक सुरुवातीचे खर्च घटक काढून टाकल्यामुळे आम्ही गृहखरेदीदारांना अधिक आत्मविश्वास आणि स्पष्टता देत आहोत. घरमालकीचा अनुभव पारदर्शक, सक्षम करणारा आणि सुलभ असावा, हा आमचा ठाम विश्वास आहे."

### भोपाळचे भीमबेटका

मध्य प्रदेश, भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य, त्याचे प्रशासकीय केंद्र भोपाळमध्ये आहे. मोठ्या संख्येने अभ्यागत या प्रदेशाकडे आकर्षित होतात कारण त्याचा एक प्रसिध्द इतिहास आणि नैसर्गिकरित्या सुंदर आकर्षणे भरपूर आहेत.. भीमबेटकामध्ये अनेक रॉक आश्रयस्थान आहेत जे दक्षिण आशियातील मानवी अस्तित्वाचा सर्वात जुना पुरावा दर्शवतात. 2003 हे वर्ष होते जेव्हा ते जागतिक वारसा स्थळ म्हणून नियुक्त केले गेले होते. भीमबेटका येथे पाचशेहून अधिक दगडी गुहा आणि निवारे सापडतील, त्या प्रत्येकामध्ये लक्षणीय कलाकृती आहेत. जरी अनेक मूलभूत आकार मध्ययुगीन काळापासूनचे असले तरी, असे मानले जाते की सर्वात जुनी रेखाचित्रे 30,000 वर्षांपूर्वीची आहेत. डिझाईन्स बहुतेक वेळा फाटक्या आत किंवा आतील भिंतींवर पूर्ण केल्या जात असल्यामुळे, वापरण्यात आलेले रंग हे भाज्यांचे रंग आहेत जे कालांतराने टिकून आहेत. जवळजवळ कोणत्याही वयोगटातील व्यक्तींना जाण्यासाठी आणि वेळ घालवण्यासाठी हे एक अद्भुत गंतव्यस्थान आहे. भोपाळ आणि होशंगाबादच्या महानगर क्षेत्राला जोडणारा राष्ट्रीय महामार्ग 12, पर्यटकांना गुहेपर्यंत पोहोचण्याचा सोपा मार्ग प्रदान करतो

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे

# संवाद हा नात्याचा पाया असतो

नातेसंबंध म्हणजे दोन व्यक्तींमधील बंधन. हे बंधन प्रेम, आपुलकी, जबाबदारी, अपेक्षा आणि समर्पण यावर उभं असतं. पण या सगळ्याच्या मुळाशी जर काही असेल, तर तो म्हणजे संवाद. संवाद हा नात्याचा पाया आहे. संवादाच्या अभावामुळे कित्येक सुंदर नाती विस्कटून जातात, तर संवाद योग्य पद्धतीने झाल्यास कोणत्याही अडचणींवर मात करता येते. कोणत्याही नात्यात विश्वास टिकवण्यासाठी आणि एकमेकांना समजून घेण्यासाठी संवाद आवश्यक असतो.

जेव्हा पती व पत्नी ही माणसं प्रामाणिक आणि गंभीरपणे संवाद साधू शकतात, तेव्हा ते एकमेकांचे सर्वोत्तम मानसशास्त्रज्ञ ठरू शकतात. कारण मानसशास्त्र हे मन आणि वर्तन याचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. एका व्यक्तीला दुस-याच्या मनातील भावना, विचार, भीती, स्वप्नं आणि असुरक्षितता समजून घेणं गरजेचं असतं. हे समजून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आत्मपरीक्षण आणि संवेदनशीलता लागते. त्यासाठी खुलेपणाने आणि प्रामाणिकपणे संवाद साधण्याची तयारी असावी लागते.

कित्येक वेळा लोकं नातेसंबंधांच्या गुंतागुंतीबद्दल तक्रार करतात. "संबंध फार क्लिष्ट झालेत," "तो मला समजून घेत नाही," "ती कायम काही ना काही तक्रार करत असते" अशा अनेक तक्रारी ऐकायला मिळतात. पण खरा प्रश्न हा असतो की, आपण एकमेकांशी स्पष्ट आणि मोकळेपणाने बोलतो का? एका नात्यात संवादाचा अर्थ फक्त बोलणे एवढाच नसतो तर ऐकणे, समजून घेणे, भावनांचा सन्मान करणे आणि उत्तरदायित्व स्वीकारणे



देखील तितकेच महत्त्वाचे असते. ब-याचदा आपण आपले मुद्दे मांडतो, पण समोरच्या व्यक्तीचे ऐकत नाही. हेच नात्यातील संघर्षाचे मूळ असते.

ज्यावेळेस नात्यांमधे संवाद कमी होतो, त्यावेळी दुरावा निर्माण होतो. समोरच्याला काय वाटते हे विचारण्याऐवजी आपण अंदाज लावतो. "तो बदलला आहे," "ती आता पूर्वीसारखी वागत नाही" अशा निष्कर्षांवर येतो. पण हे खरे आहे का? हे समजून घेण्यासाठी आपण मोकळेपणाने आणि विनासंकोच संवाद साधतो का? एकमेकांना वेळ न देणे, संवाद टाळणे, अपु-या माहितीवरून निष्कर्ष काढणे हे सर्व नात्यातील कटूता वाढवते. अनेकदा लोकं भांडण करताना आरोप-प्रत्यारोप करतात. पण जर दोघांनी शांतपणे एकमेकांचे म्हणणे ऐकले, तर हा दुरावा मिटू शकतो.

कधी कधी लोकं नात्यातील संवाद टाळतात कारण त्यांना वाटतं की, "जर मी खरं बोललो तर समोरचा दुखावला जाईल" किंवा "यावर चर्चा केल्याने काही उपयोग नाही" पण हे चुकीचे आहे. नात्यात प्रामाणिकता हवी असेल, तर आपण आपल्या भावना व्यक्त करायला पाहिजे. आपल्याला काय हवे आहे, हे स्पष्ट सांगितलं पाहिजे. "मला तुझ्याकडून वेळ हवा आहे. माझ्या भावना समजून घेण्याची तुझी इच्छा आहे का? माझ्यासाठी काय महत्त्वाचे आहे, ते तुला सांगू इच्छितो" आपण समोरच्याकडून काय अपेक्षा करता हे स्पष्ट सांगितलं पाहिजे. "मी तुझ्याकडून अधिक सहकार्याची अपेक्षा करतो. माझ्या निर्णयांचा आदर करावा, अशी माझी इच्छा आहे." असं स्पष्ट बोलायला हवं.

आपल्या मनातील ख-या भावना लपवून न ठेवता बोललं पाहिजे. जर एखाद्या व्यक्तीला काही त्रास होत असेल, पण ती ते बोलत नसेल तर समोरचा कसा समजून घेणार? अजून तरी मनातील ओळखणारे कुठलंही स्कॅनिंग अस्तित्वात आलं नाही. नात्यात अनेक समस्या असू शकतात. विश्वासघात, मतभेद, आर्थिक प्रश्न, मानसिक तणाव, कौटुंबिक जबाबदा-या इत्यादी. त्यातून कधीही परिस्थिती चिघळू शकते. भांडणाच्या वेळी किंवा तणावाखाली असताना संवाद करणे टाळलं, तर पुढे संवाद टिकून राहतो.

वैयक्तिक आयुष्यात पती-पत्नी दोघंही अनेकदा भांडतात. एक दोनदा पत्नी टोकाचा राग अनुभवतात. पण प्रत्येक वेळेस वाद झाला, भांडणं झालं तरी बोलणं टाकायचं नाही. भांडणाच्या वेळी विषय वेगळं वळण घेऊन कायमचा संवाद संपवू शकतो. त्यामुळे जेव्हा कधी वातावरण निवळेल तेव्हा शांततेत संवाद केल्यास तो अधिक प्रभावी ठरतो. विश्वास हा नात्याचा गाभा आहे आणि विश्वास दृढ करण्यासाठी प्रामाणिक संवाद आवश्यक असतो. जर तुम्ही नेहमी खरे बोलत असाल, समोरच्याची फसवणूक करत नसाल तर तुमच्या नात्यात एक वेगळाच घट्टपणा येतो. विश्वासघात झाल्यास संवाद हा तो दुरुस्त करण्याचा मार्ग असतो. कुणालाही पूर्णपणे समजून घेणे सहज शक्य नसते. पण संवादाच्या माध्यमातून त्या अंतरावर विजय मिळवता येतो.

नातेसंबंध टिकवण्यासाठी महागड्या भेटवस्तू, मोठ्या योजना किंवा अविश्रांत प्रयत्न करण्याची गरज नसते. गरज असते ती फक्त प्रामाणिक आणि खुले संभाषण करण्याची. त्यामुळे कितीही वादविवाद झाले तरी संवाद शक्य तितका जोडून ठेवायचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा संवाद योग्यरित्या होतो, तेव्हा कोणताही वाद मिटू शकतो. नातं टिकू शकतं, फुलू शकतं आणि अधिक सशक्त बनू शकतं. त्यामुळे संवादाला पर्याय नाही. यासाठी बोलत रहा, हसत रहा आणि नातं जपत रहा.


■ शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ

# भिवंडी पालिकेत बंडखोरी करणाऱ्यांवर कारवाई करणार : रवींद्र चव्हाण

■ मुंबई : वृत्तसंस्था

भिवंडी महापालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीत शुक्रवारी राजकीय नाट्य पाहायला मिळाले. भाजपचे बंडखोर नारायण चौधरी यांनी काँग्रेसच्या पाठिंब्यावर महापौरपद मिळवले. या निवडणुकीत भाजपचे सहा नगरसेवक फुटल्याचे स्पष्ट झाले असून, या बंडखोरांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिले आहेत.

भिवंडीत महापौर निवडीच्या प्रक्रियेत सुरुवातीपासूनच चुरस निर्माण झाली होती. भाजपने सुरुवातीला



नारायण चौधरी यांच्या नावाचा विचार केला होता, मात्र प्रदेश पातळीवरील चर्चेनंतर आणि बदललेल्या राजकीय समीकरणांनंतर स्नेहा पाटील यांना अधिकृत उमेदवारी देण्याचा निर्णय झाला. मात्र, चौधरी यांनी बंडखोरी करीत काँग्रेस आणि शरद पवार गटाचा पाठिंबा मिळवला. महापौर पदाच्या निवडणुकीत त्यांना ४८ मते मिळाली. तर, भाजपच्या अधिकृत उमेदवार स्नेहा पाटील यांना केवळ १६ मतांवर समाधान मानावे लागले. दुसरीकडे कोणार्क आघाडीच्या विलास पाटील यांनी २५ मते मिळवली.

या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, "महापौरपदाच्या उमेदवारीबाबत पक्षात चर्चा सुरू होती. स्नेहा पाटील यांचे नाव निश्चित झाल्यानंतर नारायण चौधरी आणि त्यांच्यासोबत असलेल्या नगरसेवकांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. बंडखोरी केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांना दिला होता. त्यांनी बंडखोरी करणार नाही असे आश्वासन दिले होते, मात्र निकालातून त्यांनी बंडखोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे," असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.

### पक्षांतर्गत कारवाईचा बडगा

**■ महापालिकेत सत्ता मिळवण्यासाठी थेट वैचारिक प्रतिस्पर्धी असलेल्या काँग्रेसशी हातमिळवणी केल्याने भाजप नेतृत्वाने हे प्रकरण गंभीरपणे घेतले आहे. "ज्यांनी–ज्यांनी पक्षाच्या ध्येयधोरणांविरुद्ध जाऊन आणि आदेश धाब्यावर बसवून काम केले आहे, त्या सर्वांवर पक्ष नियमानुसार कडक कारवाई करेल," असा इशारा चव्हाण यांनी यावेळी दिला.**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)

# पारंपारिक शेतीला बगल देत शेतकऱ्याचा 'चिया' पिकातून प्रगतीचा नवा मार्ग..!


**महापशुधन एक्सपो मध्ये चिया पीक ठरले सर्वाधिक मागणी व आकर्षणाचे पीक**

**केज तालुक्यातील बनकरंजा येथील महेश शंकर नागरगोजे यांचा नवीन प्रयोग**

**एका एकर शेतामध्ये सहा ते सात क्विंटल चे विक्रमी उत्पादन**

**1000 रुपये प्रति किलो प्रमाणे चिया पिकाला बाजार भाव**

**तीन ते साडेतीन महिन्यांमध्ये सहा ते सात लाखाचे एकरी उत्पादन**



**केज| प्रतिनिधी**

परळी मध्ये झालेल्या महाएक्सपो दरम्यान चिया पीक लागवड अत्यंत शेतकऱ्यांच्या फायद्याचे पीक ठरले आहे. बदलत्या काळात शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करणे काळाची गरज बनल्याचे . ओळखून केज तालुक्यातील बनकरंजा येथील प्रगतशील शेतकरी महेश शंकर नागरगोजे यांनी पारंपारिक पिकांना फाटा देत 'चिया' (Chia Seeds) या परदेशी पिकाची यशस्वी लागवड केली आहे. विशेष म्हणजे हे पीक पूर्णपणे सेंद्रिय पद्धतीने व कमी खर्चात तीन ते साडेतीन महिने कालावधी असलेल्या या पिकाने शेतकऱ्यांना सहा ते सात लाखाचे उत्पादन मिळवून दिले आहे. अत्यंत कमी पाणी लागत असलेल्या या ठिकाणी या पिकाने संपूर्ण चिंचाशेत वस्ती शिवारात निळसर-जांभळ्या फुलांची उधळण केली असून, परिसरात हे पीक आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या प्रयोगाची पार्श्वभूमी म्हणजे कमी पाऊस आणि बाजारभावाची अनिश्चितता यामुळे अनेक शेतकरी अडचणीत असताना, या शेतकऱ्याने आधुनिक बाजारपेठेचा अभ्यास करून 'सुपरफूड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिया सीड्सला सध्या मोठी मागणी आहे. हे लक्षात घेऊन त्यांनी आपल्या शेतात चिया या पिकाची लागवड केली.


चिया या पिकाचे पिकाची वैशिष्ट्ये आणि फायदा म्हणजेच या पिकाला कमी खर्च , कमी पाणी: कोरडवाहू किंवा कमी पाण्याच्या क्षेत्रासाठी हे पीक अत्यंत फायदेशीर आहे. कोणत्याही प्रकारच्या वन्य प्राण्यांचा त्रास नाही: चियाच्या पानांना विशिष्ट वास असल्यामुळे प्राणी या पिकाचे नुकसान करत नाहीत. आरोग्यदायी महत्त्व: ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि फायबरचा उत्तम स्त्रोत असल्याने बाजारात याला मोठी मागणी आहे. चिया हे लागवडीपासून अवघ्या ३ ते ४ महिन्यांत हे पीक काढणीला येते. "आजवर आम्ही गहू, हरभरा अशी पिके घेत होतो, पण चिया पिकातून कमी मेहनतीत चांगल्या उत्पन्नाची अपेक्षा आहे. चिया या पिकातून एक्करी 6 ते 7 कुंटल इतके उत्पन्न मिळते इतर पिकांच्या तुलनेत कमी खर्चामध्ये हे उत्पन्न मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांनीही अशा नगदी पिकांकडे वळायला हवे," शेतात डोलणारे हे जांभळ्या फुलांचे पीक पाहण्यासाठी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. या यशस्वी प्रयोगामुळे परिसरात 'चिया' लागवडीचा नवा पॅटर्न रुजण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असे मत बनकरंजा येथील प्रगतशील शेतकरी महेश शंकर नागरगोजे यांनी व्यक्त केले आहे.

**चिया पिकाच्या संदर्भात केज तालुका कृषी अधिकारी व कृषी सहाय्यक गोरे मॅडम यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभल्याने आम्ही चिया पिकातुन अत्यंत कमी खर्चामध्ये व कमी कालावधीमध्ये चांगल्या प्रकारे उत्पन्न घेत आहोत तरी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त चिया पिकाची लागवड करून कमी खर्चात उत्पन्न वाढवावे..**
**- महेश शंकर नागरगोजे, प्रगतशील शेतकरी बनकरंजा**

## चिया स्टॉलला पंकजाताईंची भेट

**महापशुधन एक्स्पो दिनांक दरम्यान मा.ना. पंकजा गोपीनाथ मुंडे (मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल ,महाराष्ट्र राज्य ) व जिल्हाधिकारी विवेक जॉनसन सर , डॉ. अर्चना नागरगोजे तालुका कृषी अधिकारी परळी यांनी सेंद्रिय उत्पादित चिया सीड्स श्री. महेश नागरगोजे रा. बनकारंजा ता. केज जि. बीड यांच्या स्टॉलला भेट देऊन चिया पिकाची लागवड, उत्पादन व बाजार यावर सविस्तर चर्चा करून अधिक भाव कसा मिळेल याबाबत मार्गदर्शन केले.**

**चिया चे बियाणे एक चमचा एक ग्लास पाण्यात रात्रभर ठेवून सकाळी पिल्याने पचन क्रिया चांगल्या प्रकारे होते, माणसांचे हात पाय दुखणे थांबते तसेच माणसांची जाडी कमी होण्यासाठी मदत होते**



# दहावी–बारावी परीक्षेत शिक्षकांवर अन्यायकारक कारवाई थांबवा; संरक्षण द्या – जिल्हाध्यक्ष शरद मगर

**बीड जिल्हा मुप्टा शिक्षक संघटनेची मागणी**

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू असून कॉपी व गैरप्रकार रोखण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. मात्र परीक्षा केंद्रांवर घडणाऱ्या सर्व प्रकारांसाठी केवळ पर्यवेक्षक व शिक्षकांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करणे ही अन्यायकारक बाब असल्याची ठाम भूमिका बीड जिल्हा मुप्टा शिक्षक संघटनेने मांडली आहे.

संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरदराव मगर यांनी सांगितले की, परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, शिक्षण विभाग व प्रशासन प्रयत्नशील आहे. बीड जिल्ह्यात 'कॉपीमुक्त अभियान' राबवले जात आहे. हॉलमध्ये पर्यवेक्षक आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत असताना परीक्षा केंद्राबाहेरून होणारा दबाव, दहशत व त्रास यासाठी शिक्षकांना जबाबदार धरणे योग्य नाही.

"परीक्षा हॉलमध्ये शिक्षकांना कोणतेही संरक्षण नसताना त्यांच्यावर थेट गुन्हे दाखल करणे किंवा कारवाई करणे चुकीचे आहे. प्रशासनाने कोणतीही कारवाई करण्यापूर्वी सखोल चौकशी करावी," अशी मागणी संघटनेने केली आहे. परीक्षा केंद्र परिसरात पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवून बाहेरील हस्तक्षेप रोखावा, जेणेकरून शिक्षक भीतीमुक्त वातावरणात आपले कर्तव्य पार पाडू शकतील, असेही त्यांनी नमूद केले.

संघटनेने स्पष्ट केले की, कॉपी पूर्णपणे बंद व्हावी यासाठी शिक्षकांचेही ठाम मत आहे; मात्र संपूर्ण



परीक्षा यंत्रणेतील जबाबदारी केवळ शिक्षकांवर टाकू नये. अन्यायकारक कारवाईमुळे शिक्षकांचे मनोबल खच्ची होईल व भविष्यात पर्यवेक्षणाची जबाबदारी स्वीकारण्यास शिक्षक तयार राहणार नाहीत, अशी चिंता व्यक्त करण्यात आली.

या मागणीस जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, जिल्हासचिव प्रा. शशिकांत जावळे, प्रा. नारायण घोलप, प्रवीण तरकसे, कार्याध्यक्ष भैय्यासाहेब आदोडे, प्रमोद साळवे, शैलेश चिलवंत, श्रीकांत वारभूवन, डॉ. संजय मुरूमकर, प्रा. बाळासाहेब गव्हाणे, प्रा. संजय काकडे, प्रा. अनिल झरे, प्रा. नितीन भोसले, प्रा. सुनील मोरे, प्रा. एल.एल. गव्हाणे, प्रा. दत्ता गायकवाड आदी पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दर्शवला आहे.

परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता राखत शिक्षकांना योग्य संरक्षण देण्यात यावे, अशी एकमुखी मागणी संघटनेने प्रशासनाकडे केली आहे.




# मुंबई ते विजयदुर्ग रोरो सेवा 1 मार्चपासून; मंत्री नितेश राणे पहिल्या फेरीने करणार प्रवास

**मुंबई – वृत्तसंस्था**

बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित रोरो सेवेला अखेर मुहूर्त मिळाला आहे. येत्या 1 मार्चपासून मुंबई ते विजयदुर्ग पर्यंत रोरो सेवा नियमितपणे सुरू होणार आहे. मुंबईतील भाऊचा धक्का येथून विजयदुर्गपर्यंत जाणारी ही रोरो सेवा मुंबई–कोकण प्रवास अधिक सोपा आणि जलद करणार आहे. यामुळे कोकण पर्यटनाला चालना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्याचे बंदरे विकास मंत्री नितेश राणे हे स्वतः पहिल्या फेरीतून प्रवास करणार आहेत.

बहुप्रतीक्षित रोरो सेवा 1 मार्च रोजी सुरु होणार आहे. मुंबईतील भाऊचा धक्का येथून 1 मार्च रोजी सकाळी 8 वाजता मुंबईहून रोरो सुटणार असून दुपारी ३ वाजता विजयदुर्ग येथे पोहोचणार आहे. तर परतीच्या प्रवासात 2 मार्च रोजी विजयदुर्गहून दुपारी 12 वाजता सुटणारी रोरो सायंकाळी 7 वाजता मुंबईत दाखल होईल. या सेवेला बंदरे विकास मंत्री नितेश राणे स्वतः पहिल्या फेरीत उपस्थित राहणार आहेत. मंत्री नितेश राणे यांनी रोरो सेवेच्या पहिल्या फेरीच्या प्रवासासाठी तिकीटही आरक्षित केले आहे.

ही सेवा महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्यावतीने सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे मुंबई–कोकण दरम्यानचा प्रवास वेळेत आणि सुलभ होण्यास मदत होणार आहे. तसेच कोकणातील पर्यटन क्षेत्राला यामुळे मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांना रोरो सेवा अधिक सोयीस्कर आणि लाभदायक ठरण्याची शक्यता आहे. यामुळे प्रवास सोयीस्कर होणार असून महत्त्वाची जलवाहतूक सुविधा आता सिंधुदुर्गकरांसाठी उपलब्ध होत आहे. या सेवेमुळे प्रवाशांना जलमार्गाने जलद आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव करता येईल.

एम2एम प्रिन्सेस या बोटीचा मार्च महिन्यातील संपूर्ण शेड्यूल समोर आला आहे. 1 मार्च मुंबई ते विजयदुर्ग 2 मार्च रोजी विजयदुर्ग ते मुंबई पुन्हा 4 मार्च रोजी मुंबई ते विजयदुर्ग आणि 5 मार्च रोजी विजयदुर्ग ते मुंबई असा प्रवास कता येणार आहे. 1 ते 26 मार्च पर्यंतचे वेळापत्रक समोर आले आहे. प्रवाशांनी रोरो सेवेच्या नियोजित वेळेच्या 90 मिनिटे आधी बंदरावर उपस्थित राहावे असे आवाहन प्रशानाच्यावतीने करण्यात आले आहे. हवमान आणि तांत्रिक कारणांमुळे वेळापत्रकात बदल होण्याचीही शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# मुक्ताईनगर : शिवजयंतीनिमित्त लेखनातून शिवविचारांचा जागर; 405 विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग









**मुक्ताईनगर | प्रतिनिधी**

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त योगमाया प्रतिष्ठान, मुक्ताईनगर यांच्या वतीने भव्य निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. "लेखन संस्कृती जपत शिव विचारांचा जागर" हा संदेश देणारी ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये इतिहास, संस्कार आणि राष्ट्राभिमान रुजविणारी ठरली.

नोंदणीकृत सामाजिक संस्था असलेल्या योगमाया प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांनी शिवरायांचे विचार, स्वराज्यनिर्मितीचा संघर्ष, लोककल्याणकारी नेतृत्व आणि राष्ट्रधर्म यांचा अभ्यास, चिंतन आणि लेखनाद्वारे आत्मसात करावा हा होता. मुक्ताईनगर शहरातील सहा परीक्षा केंद्रांवर ही स्पर्धा उत्साहात पार पडली. प्रत्येक केंद्रावर शिवरायांच्या प्रतिमेला अभिवादन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली, ज्यामुळे वातावरणात प्रेरणादायी उत्साह निर्माण झाला.

स्पर्धा गटनिहाय घेण्यात आली. इयत्ता पाचवी ते आठवी या प्रथम गटात ३२१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. "शिवराय माझे आवडते राजे", "छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण आणि जिजाऊंचे संस्कार" तसेच "गड-किल्ले संवर्धन काळाची गरज" या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी निबंध सादर केले.

इयत्ता नववी ते बारावी या द्वितीय गटात ६३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत "छत्रपती शिवाजी महाराज आणि पर्यावरण", "आजच्या काळात शिव विचारांची गरज" आणि "भारतीय नौदलाचे जनक : छत्रपती शिवाजी महाराज" या विषयांवर विचारमंथन केले.

तर वरिष्ठ महाविद्यालयीन तृतीय गटात २९ विद्यार्थ्यांनी "स्वराज्य ते सुराज्य : एक प्रवास", "शिवराय : एक सर्वसमावेशक लोककल्याणकारी राजा" आणि "शिवरायांचे लष्करी व्यवस्थापन व गनिमी कावा" या विषयांवर सखोल लेखन सादर केले.

एकूण ४०५ विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही स्पर्धा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ठरली. विद्यार्थ्यांच्या लेखनातून शिवचरित्राविषयीचा आदर, अभ्यासू वृत्ती आणि राष्ट्रभक्तीची जाणीव प्रकर्षाने दिसून आली.

ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी योगमाया प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. अश्विन सुरवाडे यांच्यासह संकेत कपले, मयूर पाटील, सनत जैन, प्रवीण राठोड, मनीष महाजन, तेजस सापधरे, वैभव इंगळे, रूपेश कोळी, विश्वजित देशमुख, अनिल गवते आदींनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे मुक्ताईनगरात शिवजयंतीचा उत्सव केवळ साजरा न होता विद्यार्थ्यांच्या लेखनातून शिवविचारांचा जागर घडल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.



# अविरत बारा वर्षांपासून समीर शेख यांच्याकडून शिवज्योत प्रज्वलित

## शिवनेरी ते सांगवी पाटण 200 किमी पायी शिवज्योत – हिंदू-मुस्लिम एकोप्याचा प्रेरणादायी संदेश

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील उच्चशिक्षित युवक समीर शेख गेल्या बारा वर्षांपासून शिवनेरी किल्ला येथून सांगवी पाटणपर्यंत पायी शिवज्योत आणत असून, या उपक्रमातून समाजात एकता, बंधुता व सर्वधर्मसमभावाचा संदेश देत आहेत.

**छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी वारसा**

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी राजे नव्हते, तर आदर्श राज्यकर्ते, कुशल सेनानी व दूरदृष्टी असलेले समाजसुधारक होते. त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हे फक्त राजकीय स्वातंत्र्य नव्हे, तर सामाजिक समतेचे प्रतीक होते. जाती-धर्माचा भेद न करता योग्यतेनुसार सर्वांना संधी देणारी प्रशासन व्यवस्था त्यांनी उभी केली. 'प्रजेचे राज्य प्रजेसाठी' हा विचार प्रत्यक्षात आणत त्यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी केली.

२०० किलोमीटरचा अविरत पायप्रवास यंदाही समीर शेख यांनी ओंकार खिलारे, दादा इरले व गावातील मावळ्यांसमवेत सुमारे २०० किलोमीटरचा पायी प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. एम.एस्सी., बी.एड., एम.एड. असे उच्च शिक्षण घेतलेले समीर शेख उच्च विचारसरणीचे व समाजासाठी समर्पित युवक म्हणून ओळखले जातात.

शिवनेरीवरून प्रस्थान करताना जुन्नर नगरपंचायतीच्या वतीने त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. धामणगाव येथे शिवज्योत पोहोचल्यावर संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी स्वागत करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

हिंदू-मुस्लिम एकोप्याचे जिवंत उदाहरण

यावेळी समीर शेख म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारताना कधीही जाती-धर्माचा भेद केला नाही. अठरा पगड जातींना सोबत घेऊन त्यांनी स्वराज्य निर्माण केले. मी अभिमानाने सांगतो – मी छत्रपतींचा मुस्लिम मावळा आहे."

गेल्या आठ वर्षांपासून समीर शेख हे भैरवनाथ जन्माष्टमी सोहळ्यानिमित्त वाराणसी (काशी) येथून गंगाजल आणत आहेत, तर बारा वर्षांपासून शिवनेरी ते सांगवी पाटण शिवज्योत आणण्याची परंपरा ते अविरतपणे जपत आहेत.

समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम

या उपक्रमात विविध जाती-धर्मातील युवक मोठ्या संख्येने सहभागी होत असून, समाजात एकात्मता, सलोखा व शिवरायांच्या विचारांचा प्रचार-प्रसार होत आहे. हा उपक्रम म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जिवंत वारसा असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# जवळा फकीर येथे 28 फेब्रुवारी रोजी दुसरी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद

## बहुजन समाजाच्या एकतेचा, प्रबोधनाचा आणि धम्मदीक्षेचा भव्य सोहळा

**परळी (प्रतिनिधी):**

ज्ञानालंकार धम्म संस्कार प्रशिक्षण संस्थेच्या वतीने जवळा फकीर, ता. धारूर येथे शनिवार दिनांक 28 फेब्रुवारी रोजी दुपारी 12 वाजता दुसरी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. मृगदायवन महाविहार, सारनाथ पार्क परिसर, जवळा फकीर येथे होणाऱ्या या धम्ममय सोहळ्यास बहुजन समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मुख्य संयोजक भदन्त पय्यातीस्स महाथेरो यांनी केले आहे.

या धम्म परिषदेचे उद्घाटन डॉ. प्रा. खेमधम्मो (मुळावा) यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी डॉ. भदन्त उपगुप्त महाथेरो (पूर्णा) राहणार आहेत. ध्वजारोहणाचा मान डॉ. प्रा. भदन्त एम. सत्यपाल महाथेरो (छत्रपती संभाजीनगर) यांना मिळणार आहे.

प्रमुख अतिथी म्हणून पु. भदन्त डॉ. इंदवंश महाथेरो (कुशीनगर, उत्तर प्रदेश), भदन्त मुदितानंद महाथेरो (परभणी), भदन्त पय्याबोधी थेरो (नांदेड), भदन्त पय्यानंद थेरो (लातूर) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच भदन्त धम्मसार थेरो (किल्लारी), भदन्त सुभूती थेरो (नांदेड), भदन्त



धम्मशील थेरो (बीड), भदन्त नागसेन बोधी (उदगीर) आदी भन्ते या परिषदेत मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, रिपाई लातूरचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, ज्येष्ठ नेते श्रीकांत बनसोडे, आर. जी. कांबळे (अहमदपूर), बा. ह. वाघमारे (अहमदपूर), श्रीराम खळगे (माजलगाव), सतीश बनसोडे (सेलू), जयश्रीताई साळवे (बीड), ललिताताई उजगरे (माजलगाव), एस. एस. शिंदे (बीड), उत्तम डोंगरे (अंबाजोगाई), माधवराव वाघमारे (अंबाजोगाई), गोपीनाथ बनसोडे (बीड), स्नेहा खंडागळे (बीड), कचरूतात्या खळगे (माजलगाव), विनयजी ढवळे (अहमदपूर) आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

मृगदायवन महाविहार उभारणीसाठी प्रभाकर सोनबा गवळी व शांता प्रभाकर गवळी या दाम्पत्याने उदार अंत:करणाने आपली जमीन दान देऊन धम्मकार्याला मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या दानशूर कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ही परिषद बौद्ध धम्माच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार, बहुजन समाजाचे संघटन, नैतिक मूल्यांची जपणूक आणि सामाजिक परिवर्तनाचा दृढ संकल्प यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. बौद्ध उपासक-उपासिका तसेच बहुजन बांधवांनी शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थित राहून धम्मकार्याला बळ द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

"बहुजन हिताय, बहुजन सुखाय" या पवित्र धम्मतत्त्वाने प्रेरित होऊन जवळा फकीर येथे 28 फेब्रुवारी रोजी धम्मजागराचा ऐतिहासिक क्षण साक्षीदार ठरणार आहे.




**महापशुधन एक्स्पो दिनांक १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान डॉ. अर्चना नागरगोजे तालुका कृषि अधिकारी परळी वैद्यनाथ जि बीड , पत्रकार दुर्गादास लांब,शिल्पा बनाळे विस्तार अधिकारी, प्रज्ञा भोळे ग्राम विकास अधिकारी यांची सेंद्रिय उत्पादित चिया सीड्स महेश नागरगोजे रा. बनकारंजा ता. केज जि. बीड यांचे स्टॉलला भेट देऊन उपस्थित शेतकरी यांचेसोबतही चर्चा करण्यात आली.**




# महाराष्ट्र: ७५ लाख लोक रेशन कव्हरमधून वंचित, एमपीजेने मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले उत्पन्न मर्यादा वाढवण्याची मागणी

**परळी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रात लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली (टीपीडीएस) आणि राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा (एनएफएसए) अंतर्गत रेशन पात्रतेसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादेत त्वरित वाढ करण्याची मागणी मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टिस फॉर वेल्फेअर (एमपीजे) ने केली आहे. या संदर्भात संघटनेने मुख्यमंत्र्यांना एक सविस्तर निवेदन सादर केले आहे.

एमपीजेने चिंता व्यक्त केली की रेशन पात्रतेसाठी सध्याची वार्षिक उत्पन्न मर्यादा शहरांमध्ये ₹९,००० आणि खेड्यांमध्ये ₹४,००० आहे. हे मानक १० वर्षांहून अधिक जुने आहे. आजच्या कंबरडे मोडणाऱ्या महागाईमध्ये, दरमहा ₹,००० पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना "आर्थिकदृष्ट्या संपन्न" मानून रेशनपासून वंचित ठेवणे पूर्णपणे अमानवीय आणि वास्तविकतेशी विसंगत आहे.

अलिकडेच झालेल्या सरकारी पडताळणी मोहिमेमुळे राज्यातील सुमारे ७५ लाख लोकांना रेशन कव्हरमधून वगळण्यात आले आहे. माध्यमांशी बोलताना एमपीजेच्या प्रवक्त्याने सांगितले की, इतक्या कमी उत्पन्न मर्यादेमुळे, खरोखरच गरजू कुटुंबांनाही यादीतून वगळण्यात आले आहे. महाराष्ट्रात आधीच कुपोषणाची गंभीर समस्या आहे आणि गरिबांना अन्नधान्याच्या अधिकारापासून वंचित ठेवणे हे त्यांच्या जगण्याच्या अधिकारावर हल्ला आहे.

सध्याच्या उत्पन्न मर्यादेनुसार, गरीब कुटुंबाला घरभाडे देणेही अशक्य आहे, अन्न आणि शिक्षण तर दूरच.

महाराष्ट्र सरकारने वार्षिक उत्पन्न मर्यादा ₹५०,००० पर्यंत वाढवावी किंवा ती महाराष्ट्र सरकारच्या अकुशल कामगारांसाठीच्या किमान वेतनाशी जुळवावी अशी मागणी एमपीजेने केली आहे. एमपीजेने सरकारला या असंवेदनशील धोरणात सुधारणा करून गरिबांना न्याय देण्याचे आवाहन केले आहे. जर उत्पन्न मर्यादा लवकरच सुधारली नाही, तर राज्यात अन्न असुरक्षितता आणि कुपोषणाचे संकट आणखी वाढू शकते.

यावेळी MPJ जिल्हाध्यक्ष सय्यद सबाहत अली, उपाध्यक्ष शेख मिन्हाजुद्दीन, सचिव हाफिज अब्दुल हफीज, परळी तालुकाध्यक्ष Er. अरबाज खान, परळी तालुका उपाध्यक्ष सय्यद अहमद , शेख नवीद , शेख वाजिद हाफिज कलीम आदी उपस्थित होते.

# अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज पादुका दर्शन सोहळा २१ फेब्रुवारी रोजी बीडमध्ये

**बीड (प्रतिनिधी)**

दक्षिण पीठ, नाणीज धाम येथील अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पावन पादुकांचे भव्य दर्शन सोहळा शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता बीड–जालना रोड, श्री संत सेवालाल महाराज चौक, कॅनॉल रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे.

रामानंद संप्रदायाच्या वतीने देशभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असून, या कार्याची व्याप्ती व्यापक आहे. संस्थानमार्फत राष्ट्रीय महामार्गांवर ५४ विनामूल्य रुग्णवाहिका सेवा सुरू आहे. गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून बारावीपर्यंत मोफत शिक्षण दिले जाते. व्यसनमुक्ती अभियानातून लाखो लोकांना नवजीवन मिळाले आहे.

याचबरोबर दि. ४ जानेवारी ते १८ जानेवारी या १५ दिवसांच्या कालावधीत संप्रदायाच्या माध्यमातून १ लाख ७१ हजार १५० रक्तकुप्यांचे संकलन करून महाराष्ट्र शासनाला दान करण्यात आले, जो एक विश्वविक्रम मानला जात आहे. तसेच १३३ अवयवदान आणि १७९ देहदान



विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना सुपूर्द करण्यात आले आहेत. "पाणी अडवा, पाणी जिरवा" उपक्रमांतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात ४५९८ कच्चे बंधारे बांधण्यात आले असून जलसंधारण क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य झाले आहे.

महाड, सांगली, कोल्हापूर व रत्नागिरी येथील पूरपरिस्थितीत संप्रदायामार्फत धान्यवाटप, स्वच्छता मोहीम व इतर मदतकार्य राबविण्यात आले. दरवर्षी पादुका दर्शन सोहळ्याच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शाळांना प्रयोगशाळा साहित्य, तसेच शेतकऱ्यांना गाई, म्हशी, शेळ्या, कृषी पंप साहित्य व बियाणांचे वाटप केले जाते.

दि. २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून भव्य शोभायात्रेला प्रारंभ होणार असून, सकाळी १० वाजेपर्यंत शोभायात्रा कार्यक्रमस्थळी पोहोचेल. त्यानंतर दिवसभर विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात पादुका व गुरुपूजन सोहळा, जगद्गुरु पादुका पूजन, सामाजिक उपक्रमांतर्गत ८१ सायकलींचे गरजू बांधवांना वाटप, प्रवचन, आरती सोहळा, उपासक दीक्षा, दर्शन, महाप्रसाद तसेच पुष्पवृष्टीने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

या भव्य सोहळ्यास बीड तालुका व जिल्हाभरातून हजारो भाविक उपस्थित राहणार असून, सर्व भक्तगणांनी गुरुमाऊलींच्या सिद्ध पादुकांचे दर्शन घेऊन कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन बीड जिल्हा रामानंद संप्रदायाच्या वतीने करण्यात आले आहे.

